MHKO110000642026

**नियमित दिवाणी दावा नं. ०१/२०२६**

**सुरज कोंडीबा पोवार वगैरे**

**विरुद्ध**

**धनाजी पांडुरुग पोवार वगैरे**

## निशाणी क्रमांक २९ वरील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकत क्र. १(अ) बाबत प्रतिवादी क्र.२ यांनी विक्री, हस्तांतरण, ताबा बदल, तृतीय पक्षाचे हक्क निर्मिती अथवा कोणताही व्यवहार करु नये यासाठी जैसे थे परिस्थिती ठेवण्याकरिता दाखल केला आहे.

**०२.** वादी कथन करतात की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटपासाठी, हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत असून सदर मिळकतीचे अद्यापी सरस निरस मानाने वाटप झालेले नसताना प्रतिवादी क्र. १ यांनी बेकायदेशीरपणे दावा मिळकत क्र. १(अ) ही मिळकत बक्षीसपत्राने स्वत:चे नावे करुन घेतलेली आहे व सदरची मिळकती प्रतिवादी क्र. २ बँकेकडे गहाण ठेवली आहे. प्रतिवादी क्र. २ हे दि. ०६/०४/२०२६ रोजी या कामी हजर होऊन देखील त्यांनी अद्यापी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे वादी यांचा निशाणी क्र. ५ वरील तूर्तातूर्त मनाईचा अर्ज प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्याकडून घेतलेले कर्ज जाणीवपूर्वक थकीत ठेवल्यामुळे प्रतिवादी क्र. २ हे दावा मिळकत क्र. १(अ) जप्त करुन विक्री करणेच्या प्रयत्नात आहेत. तसे झालेस वादी यांचे कधीही न भरुन येणार नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

**०३.** वारंवार पुकारा करता प्रतिवादी क्र. २ व त्यांचे विधीज्ञ हे आजरोजी न्यायालयात उपस्थित नाहीत. सबब, प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणेविना चालविणेत येतो.

**०४.** वादीतर्फे विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जातील कथनांचा पुनरुच्चार करुन युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत असून अद्यापी सदर मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकत क्र. १(अ) ही बक्षीसपत्राने स्वत:चे नावावर करुन सदर मिळकत प्रतिवादी क्र. २ यांच्याकडे कर्जाकामी गहाण ठेवलेली आहे. सदरचे कर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी जाणीवपूर्वक थकीत ठेवल्यामुळे प्रतिवादी क्र. २ हे दावा मिळकत क्र. १(अ) जप्त करुन विक्री करणेच्या प्रयत्नात आहेत. सदर मिळकत जप्त झालेस वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

**०५.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्या विरुद्ध हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांना दाव्याचे समन्स लागू होऊन ते दि. ०६/०४/२०२६ रोजी प्रस्तुत कामी हजर झालेले आहेत. तथापि, प्रतिवादी क्र. २ यांनी दाव्याकामी त्यांची कैफीयत व म्हणणे दाखल केलेले नाही. दावा मिळकत क्र. १(अ) ही वडीलोपार्जित मिळकत असून प्रथमदर्शनी वाटप झालेले नाही असे दिसून येते. सबब, वादी यांना प्रथमदर्शनी केस दिसून येते. प्रतिवादी क्र. २ हे दाव्यात हजर होऊन देखील त्यांनी कैफीयत अथवा निशाणी क्र.०५ ला म्हणणे दिलेले नाही. आजरोजी देखील प्रतिवादी क्र. २ या कामी हजर नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांनी दावा मिळकतीची तबदीली केल्यास वादी यांच्या दावा मिळकतीमधील हक्क व हितसंबंधांवर बाधा निर्माण होऊ शकते. सबब, वादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्याप्रमाणे मी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१) अर्ज (निशाणी क्र. २९) मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. २ यांना दावा मिळकत क्र. १(अ) मध्ये पुढील तारखेपर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेशीत करण्यात येते.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

JYOTI NITIN BHASME

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.05.02 17:27:46 +0530

**पेठ–वडगांव.** **( जे. एन. भस्मे )**

दिनांक ०२/०५/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.